# POP प्रशिक्षण सत्र क्र. 27

पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर येथे महाराष्ट्रातील कोल्हापूर, पुणे ग्रामीण, सातारा, नाशिक ग्रामीण, धुळे, नंदुरबार, छ.संभाजीनगर ग्रामीण, जालना, बीड, धाराशिव, नांदेड, लातूर, परभणी, अमरावती ग्रामीण, वाशिम, बुलढाणा, नागपूर ग्रामीण, गडचिरोली, गोंदीया, लोहमार्ग पुणे व लोहमार्ग छ.संभाजीनगर अशा एकुण २१ घटकांचे आस्थापनेवर भरती झालेले सत्र क्र २७ मधील ३९३ नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थी यांचा दीक्षांत संचलन समारंभ दिनांक १८/०८/२०२५ रोजी सकाळी ०८.०० ते ९.०० वा. च्या दरम्यान संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन **मा. श्री. प्रविणकुमार पडवळ, (भा.पो.से.), विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई** हे उपस्थित होते. सदर समारंभात प्रशिक्षणार्थी यांनी मान्यवरांना मान वंदना दिली, प्रमुख पाहुणे यांनी परेडचे निरीक्षण केले. त्यानंतर दीक्षांत संचलन समारंभातील प्रशिक्षणार्थीनी संचलन केले. परेड कमांडर रोल नं. ७५ विकास अर्जुन शिरसाट, , मुळ घटक - पुणे ग्रामीण व दुय्यम कंमाडर म्हणून रोल नं. ०७ रोहन रामदास राऊत, मूळ घटक- पुणे ग्रामीण हे होते. परेड कमांडर रोल नं. ७५ विकास अर्जुन शिरसाट यांनी परेड मार्च केली. सदर दीक्षांत संचलनामध्ये १० प्लाटून (३३० प्रशिक्षणर्थी) चा सहभाग होता. त्यानंतर झालेल्या निष्क्रमण संचलनामध्ये ३९३ नवप्रविष्ट पोलीस शिपाई यांनी सहभाग घेतला. नवप्रविष्ट पोलीस प्रशिक्षणार्थी यांनी कर्तव्यनिष्ठेची, प्रामाणिकतेची शपथ घेतली. सदर परेड करीता बँन्ड पथकात सोलापूर शहर पोलीस दलाचे पथक हजर होते. सदर सत्रामध्ये खालील प्रशिक्षणार्थीना बक्षिस व प्रमाणपत्र देवून त्यांचा गौरव केला.

| अ.क्र. | तपशिल | प्रशिक्षणार्थीचे नांव |
|---|---|---|
| १ | कायदा विषय क्र. १ ते ३ मध्ये प्रथम | रोल नं. ७५ विकास अर्जुन शिरसाट, पुणे ग्रामीण |
| २ | कायदा विषय क्र.४ ते ८ मध्ये प्रथम | रोल नं. १७५ तबाजी निवृत्ती पानसरे, पुणे ग्रामीण |
| ३ | आंतरवर्ग सर्व विषयांत प्रथम | रोल नं. २६० अभिजीत हणमंत पाटील, पुणे ग्रामीण |
| ४ | बाह्यवर्ग प्रथम | रोल नं. ७५ विकास अर्जुन शिरसाट, पुणे ग्रामीण |
| ५ | कमांडो प्रशिक्षण प्रथम | रोल नं. ४५ सुशिलकुमार मदन ठाकरे, नाशिक ग्रामीण |
| ६ | कमांडो प्रशिक्षण प्रथम | रोल नं. ३३१ किरण चिमाजी बाळकोळी, पुणे ग्रामीण |
| ७ | गोळीबार सराव प्रथम | रोल नं. ११६ जितेंद्र शंकर गवळी, पुणे ग्रामीण |
| ८ | शारिरिक कवायत प्रथम | रोल नं. ७५ विकास अर्जुन शिरसाट, पुणे ग्रामीण |
| ९ | शारिरिक कवायत प्रथम | रोल नं. ५४ किरण संजय लोंढे, पुणे ग्रामीण |
| १० | बेस्ट खेळाडू ट्रिपल जंप | रोल नं. २३२ आकाश दुर्गादास इंदोरकर, अमरावती ग्रामीण |
| ११ | सर्वोत्कृष्ठ प्रशिक्षणार्थी द्वितीय | रोल नं. १७५ तबाजी निवृत्ती पानसरे, पुणे ग्रामीण |
| १२ | सर्वोत्कृष्ठ प्रशिक्षणार्थी प्रथम | रोल नं. ७५ विकास अर्जुन शिरसाट, पुणे ग्रामीण |

त्याच बरोबर सदर सत्रामध्ये आंतरवर्ग व बाहयवर्गाचे कामकाज उत्कृष्ट रित्या पार पाडलेने, खालील नमूद पोलीस अधिकारी / अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांचा प्रशंसापत्र देऊन गौरव करण्यात आला.

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार/लिपीक यांचे नांव | तपशिल |
|---|---|---|
| १ | श्री. अशोक सायकर, उप प्राचार्य | अंतिम परिक्षा उत्कृष्ठ नियोजन |
| २ | पोनि पांडुरंग भोपळे | आंतरवर्ग समन्वय अधिकारी |
| ३ | रापोनि ओमाजी सातपुते | बाह्यवर्ग प्रशिक्षण उत्कृष्ठ कामगिरी |
| ४ | पोउपनि गणेश कोल्हाळ | आंतरवर्ग प्रशिक्षण उत्कृष्ठ कामगिरी |
| ५ | सपोउपनि अनिल जाधव | कवायत निदेशक उत्कृष्ठ कामगिरी |
| ६ | वश्रेलि देविदास पिसे | सत्राचे उत्कृष्ट प्रशासकीय कामकाज |
| ७ | कश्रेलि महेश भागवत | सत्राचे उत्कृष्ट प्रशासकीय कामकाज |

सदर दीक्षांत संमारंभाच्या अनुषगांने मा. प्राचार्य, श्री. विजयकुमार चव्हाण सर यांनी अहवाल वाचन केले त्यामध्ये त्यांनी सत्र क्र २७ चे प्रशिक्षण हे दि. १२/१२/२०२४ ते १८/०८/२०२५ दरम्यान झाल्याचे सांगुन सदर सत्राकरीता महाराष्ट्रातील विविध घटकातुन आलेल्या ३९३ प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण दिल्याचे सांगितले. सदर प्रशिक्षणार्थीना आंतरवर्ग प्रशिक्षणात कायदे, पोलीस संघटन, शास्त्रोक्त तपास, तपासाच्या कार्यपध्दती अशा विविध विषयाचे उत्तम शिक्षण दिले तसेच बाहयवर्ग प्रशिक्षणात परेड / कवायत व्दारे शारीरीक व मानसिक दृष्ट्या कणखर व सक्षम बनविण्याचे प्रशिक्षण दिले. व त्याकरीता आंतरवर्ग, बाहयवर्ग अधिकारी यांनी परीश्रम घेतले तसेच सदर प्रशिक्षणात त्यांना योगा प्रशिक्षण, देण्यात आल्याचे सांगितले.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले मा. श्री. प्रविणकुमार पडवळ, (भा.पो.से.), विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात, पोलीस शिपाई हा पोलीस खात्याचा महत्वाचा कणा असून राज्यघटनेने व शासनाने इतर कोणत्याही विभागास न दिलेला अधिकार म्हणजे देशाच्या अतंर्गत शिस्तीची व सुरक्षेची जबाबदारी प्रामुख्याने पोलीस खात्याला दिलेली आहे. प्रशिक्षण केंद्रामध्ये देण्यात आलेले आंतरवर्ग व बाह्यवर्ग प्रशिक्षणामुळे आज पोलीस शिपाई हा समाजातील नागरीकांच्या अडीअडचणींना सामोरे जाण्याची जबाबदारी समर्थपणे पेलत आहे. पोलीसांनी आपल्या अधिकाराचा फायदा जास्तीत जास्त गोरगरीब जनतेला होईल यासाठी दक्ष रहावे. वाढती लोकसंख्या, बदलती जीवन शैली, त्यानुसार बदललेले गुन्हयांचे स्वरूप, सायबर क्राईम आर्थिक गुन्हे, दहशतवाद या सारख्या गुन्हयांचे आवाहन

पोलीस दलासमोर असल्याने आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याची आवश्यकता असल्याने नमुद करुन प्रशिक्षणार्थी यांचे संचलन तसेच प्रशिक्षण केंद्राचा परिसर यावरुन प्रशिक्षणार्थींचा बौध्दीक व शरीरीक दर्जा चांगला असल्याची ग्वाही दिली तसेच सर्व प्रशिक्षणार्थी दीक्षांत समारंभात घेतलेल्या शपथेशी आयुष्यभर प्रामणिक राहतील असे नमुद केले.

सदर कार्यक्रमास मा. श्री. एम. राज कुमार, (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, श्री. अतुल कुलकर्णी, (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, श्री. विजय कबाडे, (म.पो.से.), पोलीस उपायुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर, डॉ. अश्विनी पाटील, (म.पो.से.), पोलीस उपायुक्त (गुन्हे), सोलापूर शहर, श्री. गौहर हसन, (भा.पो.से.), पोलीस उपायुक्त (मुख्यालय), सोलापूर शहर, श्री. प्रशांत डगळे, (भा.पो.से.), उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर उपविभाग, श्रीमती अंजना क्रिष्णा व्ही.एस., (भा.पो.से.), उपविभागीय पोलीस अधिकारी, करमाळा उपविभाग, श्री. विजय पाटील, (म.प.से.), आर.टी.ओ. सोलापूर, प्रा. रेखा पाटील, प्राचार्य, एम.आय.टी. कॉलेज, सोलापूर, श्री. सचिन शिंदे व श्री. नागेश गायकवाड, एसी, एसआयडी, सोलापूर, श्री. कृपाशंकर पांडे, भारतीय नौदल विभाग तसेच श्री गोपाळ भोसले व विजयसिंह सुरवसे, इतर सेवानिवृत अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बांधव तसेच विविध घटकातील मान्यवर, आंतरवर्ग, बाहयवर्ग अधिकारी, कर्मचारी, मंत्रालयीन अधिकारी-कर्मचारी, वर्ग-४ कर्मचारी, प्रशिक्षणार्थींचे पालक, नातेवाईक मोठया संख्येने हजर होते.

सदरचा समारंभ सोहळा शिस्तबध्दपणे उत्साहात, आनंदात पार पडला, प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचा आंनद प्रशिक्षणार्थीच्या चेह-यावर दिसत होता.



सत्र क्र. 27 चे दीक्षांत संचलन परेडचे निरीक्षण करतना श्री. प्रविणकुमार पडवळ, (भा.पो.से.) विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई



सत्र क्र. 27 चे दीक्षांत संचलन परेडचे निरीक्षण करतना श्री. प्रविणकुमार पडवळ, (भा.पो.से.) विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई



**सत्र क्र. 27 चे दीक्षांत संचलन परेडकडून मानवंदना स्विकारताना श्री. प्रविणकुमार पडवळ, (भा.पो.से.) विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा. मुंबई, श्री. एम. राज कुमार, (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, मा.श्री. अतुल कुलकर्णी, (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण व श्री विजयकुमार चव्हाण, (म.पो.से.) प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर.**



**सत्र क्र. 27 चे प्रशिक्षणार्थी दीक्षांत संचलन कार्यक्रमामध्ये शपश ग्रहण करताना.**



**सत्र क्र. 27 चे दीक्षांत संचलन कार्यक्रमामध्ये अहवाल वाचन करताना,**
**मा. श्री.विजयकुमार चव्हाण, प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर**



**सत्र क्र. 27 चे प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना प्रमुख अतिथी श्री. प्रविणकुमार पडवळ,**
**(भा.पो.से.) विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई**




प्रमुख अतिथी श्री. प्रविणकुमार पडवळ, (भा.पो.से.), विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांना सन्मानचिन्ह प्रदान करताना श्री. विजयकुमार चव्हाण, प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर



रोल नं. विकास अर्जुन शिरसाट, पुणे ग्रामीण यांना सत्र क्र. 27 चे सर्वोत्कृष्ठ प्रशिक्षणार्थी प्रथम क्रमांक ची ट्रॉफी प्रदान करताना प्रमुख अतिथी श्री. प्रविणकुमार पडवळ (भा.पो.से.), विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई



पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर परिसरामध्ये वृक्षारोपण करताना प्रमुख अतिथी श्री. प्रविणकुमार पडवळ (भा.पो.से.), विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई



पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर परिसरामध्ये वृक्षारोपण करताना अतिथी श्री. एम. राज कुमार (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, सोलापूर शहर



पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर परिसरामध्ये वृक्षारोपण करताना अतिथी श्री. अतुल कुलकर्णी (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण



पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर परिसरामध्ये वृक्षारोपण करताना अतिथी प्रा. रेखा पाटील, प्राचार्य, एमआयटी कॉलेज, सोलापूर



पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर परिसरामध्ये वृक्षारोपण करताना अतिथी श्री. कृपाशंकर पांडे, भारतीय नौदल विभाग अधिकारी.



सत्र क्र. 27 चे दीक्षांत संचलन कार्यक्रमास उपस्थित मान्यवर



सत्र क्र. 27 चे दीक्षांत संचलन कार्यक्रमास उपस्थित प्रशिक्षणार्थींचे पालक/नातेवाईक




सत्र क्र. 27 चे दीक्षांत संचलन कार्यक्रमास उपस्थित प्रशिक्षणार्थींचे पालक/नातेवाईक